# लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे ऑनलाइन आयोजन

**मुंबई (प्रतिनिधी) :** पाचव्या लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (लिफी) २०२०चे यंदा ऑनलाइन आयोजन करण्यात आले आहे. प्लेक्सिगो (यूएफओ मूव्हीजचे एक अंग)या मोबाईल ॲपवरुन प्रेक्षकांना हा महोत्सव अनुभवता येणार आहे. लिफी आपल्या पाचव्या वर्षातील आवृत्तीत उत्कृष्ट चित्रपट निर्माते वितरक एन. एन. सिप्पी यांना श्रद्धांजली वाहिली जाणार आहे आणि त्यांच्या वो कौन थी, गुमनाम, देवता, सरगम, फकिरा, चोर मचाए शोर आणि अन्य काही उत्कृष्ट चित्रपटांचे प्रदर्शनही केले जाईल, अशी माहिती लिफी महोत्सवाचे संचालक माधव तोडी यांनी दिली.